आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१३ ऑगस्ट २०२६ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेचं पावसाळी अधिवेशन संस्थगित, लोकसभेत १९ टक्के तर राज्यसभेत ३९ टक्के कामकाज

- पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री सुखबीर सिंग बादल यांच्यावर नांदेडमध्ये हल्ला, एकाला अटक

- संगीत नाटक अकादमी पुरस्कारांचं राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांच्या हस्ते वितरण, राज्यातल्या १० मान्यवरांचा गौरव

आणि

- दिल्लीच्या लाल किल्ला परिसरात गेल्या वर्षी झालेला बॉम्बस्फोट अल कायदा इन इंडियन सबकाँटीनेंट या संघटनेनं घडवला असल्याची संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेची घोषणा

**<><><><><>**

गेल्या २० तारखेपासून सुरू झालेलं संसदेचं पावसाळी अधिवेशन आज संस्थगित झालं. या अधिवेशनात लोकसभेत १९ टक्के तर राज्यसभेत ३९ टक्के कामकाज झालं. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - - होल्ड कॅप्सूल - - -**

(लोकसभेत आज सकाळी ११ वाजता कामकाजाला सुरुवात झाली तेव्हा विविध मुद्द्यांवरुन विरोधी पक्षाचे सदस्य घोषणा देत होते. त्यानंतर लगेच सभापती ओम बिर्ला यांनी राष्ट्रीय गीत वंदे मातरमसाठी उभं राहण्याची सदस्यांना विनंती केली. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह अनेक सदस्य सभागृहात उपस्थित होते. वंदे मातरम नंतर सभागृहाचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब झालं.

राज्यसभेत आज काही कागदपत्र पटलावर ठेवण्यात आली. त्यात 'खाणी आणि खनिजे सुधारणा विधेयक' विधेयक मंजूर झालं. त्यानंतर अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब केलं. त्यापूर्वी विरोधी पक्षनेते मल्लिकार्जून खर्गे यांनी त्यांच्या उत्तराखंड इथल्या रॅलीनंतर कार्यक्रम स्थळाचं शुद्धीकरण झाल्याचा मुद्दा उपस्थित केला.

**- - होल्ड बाईट - खर्गे - - -**

यांप्रकाराची चौकशी करण्याचं आश्वासन सभागृह नेते जे. पी. नड्डा यांनी दिलं.

संसदेत या अधिवेशनात एकूण १२ विधेयकं मंजूर झाली. त्यात पेपरफुटी प्रकरणी कठोर शिक्षेची तरतूद असलेलं विधेयक, केरळचं नाव बदलून केरळम करण्याचं विधेयक यासारख्या विधेयकांचा समावेश आहे. नीट पेपरफूट, आंदोलक विद्यार्थ्यांवर झालेली पोलीस कारवाई, राम मंदिर देणगी घोटाळा, झारखंडमधील विद्यार्थ्यांचे आंदोलन यासारख्या मुद्द्यांवरुन झालेल्या गदारोळामुळं लोकसभेत १९ टक्के तर राज्यसभेत ३९ टक्के कामकाज झालं. बहुतांश विधेयक चर्चेशिवाय मंजूर करण्यात आली. सरकार चर्चेसाठी तयार असतानाही विरोधी पक्षांनी संसदेतील चर्चेपासून पळ काढल्याचा आरोप केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आज पत्रकार परिषदेत केला.

**- - - -होल्ड - रिजीजू- - -**

अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर आज लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी आयोजित केलेल्या पारंपरिक चहापानाच्या कार्यक्रमावर काँग्रेस, तृणमूल काँग्रेस आणि समाजवादी पक्षाने बहिष्कार टाकला. मात्र, द्रविड मुन्नेत्र कळघमच्या नेत्या कनिमोळी या या पारंपरिक स्नेहभेटीला उपस्थित होत्या. राज्यसभा अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी आयोजित केलेल्या चहापानाच्या कार्यक्रमाला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि पक्षाच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांच्यासह विरोधी पक्षांचे नेते उपस्थित होते.)

**<><><><><>**

पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री आणि शिरोमणी अकाली दलाचे प्रमुख सुखबीर सिंग बादल यांच्यावर आज हल्ला झाला. नांदेड जिल्ह्यात मुदखेड तालुक्यातल्या मातासाहेब गुरुद्वारा इथं एका व्यक्तीनं हा हल्ला केला. त्यात जखमी झाल्यानं बादल यांना नांदेड शहरातल्या एका खाजगी रुग्णालयात दाखल केलं आहे. त्यांची प्रकृती स्थिर आहे. बादल यांच्या सुरक्षा व्यवस्थेतले पोलीस उपनिरीक्षकही यावेळी जखमी झाले. या हल्ल्याप्रकरणी पोलिसांनी एकाला अटक केली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी खासदार हरसिम्रत कौर बादल यांच्याशी दूरध्वनीवरुन संवाद साधला आणि सुखबीर सिंग यांच्या प्रकृतीची चौकशी केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी बादल यांच्याशी दूरध्वनीवरुन संवाद साधला, आणि त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली. या हल्ल्याची चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. त्यांनी नांदेडच्या पोलिस अधिकक्षकांकडून या घटनेची माहिती घेतली, आणि या हल्ल्यामागचा हेतू काय होता याचा तपास करण्याचे निर्देशही पोलिसांना दिले.

अकाल तख्ताचे जथेदार गियानी कुलदीपसिंग गर्गज्ज यांनी या हल्ल्याचा निषेध केला आहे.

**<><><><><>**

२०२४ - २५ या वर्षातल्या कामगिरीसाठीचे संगीत नाटक अकादमी पुरस्कार आज नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. संगीत, नृत्य, नाटक, लोककला, आदिवासी कला, बाहुलीनाट्य आणि नाट्यविषयक इतर कला प्रकारांमधे भरीव योगदान देणाऱ्या ४० मान्यवरांना ३ लाख रुपयांची गौरववृत्ती प्रदान करण्यात आली. ज्येष्ठ गायक अरुण कशाळकर यांचा त्यात समावेश आहे. तसंच या क्षेत्रातल्या १०८ यशस्वी कलाकारांना प्रत्येकी एक लाख रुपयाचे संगीत नाटक अकादमी पुरस्कार प्रदान करण्यात आले. ताम्रपट, आणि शाल श्रीफळ देऊन राष्ट्रपतींनी त्यांचा सन्मान केला. त्याखेरीज युवा कलावंतांसाठीचे उस्ताद बिस्मिल्लाखाँ युवा पुरस्कार यंदा देशातल्या १०६ कलाकारांना देण्यात आले.

महाराष्ट्रातून गायक आनंद भाटे, मुकुंद मराठे, सनईवादक शैलेश भागवत, नृत्यांगना शुभदा वराडकर, मनीषा साठे, संगीतकार अशोक पत्की, अभिनेता अरुण नलावडे, दिग्दर्शक प्रमोद पवार या ९ दिग्गजांना तसंच गायक कृष्णा बोंगाणे, अंकिता जोशी, भारूड गायक भावार्थ देखणे,कठपुतळी कलावंत बालकृष्ण मासगे, संवादिनीवादक तन्मय देवचके, आणि जागर कलावंत प्रवीण जाधव या ६ युवा कलावंतांना यंदा हा पुरस्कार मिळाला आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला देशवासियांना संबोधित करणार आहेत. उद्या संध्याकाळी ७ वाजता आकाशवाणीवरुन हिंदी आणि इंग्रजीतून हा संदेश प्रसारित होईल. त्यामुळं संध्याकाळचे प्रादेशिक बातमीपत्र उद्या पावणे ७ वाजता प्रसारित होईल. वृत्तविशेष हा कार्यक्रम रात्री सव्वा ८ वाजता प्रसारित केला जाईल.

**<><><><><>**

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी घरोघरी तिरंगा फडकवावा असं आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज समाजमाध्यमावरच्या संदेशातून केलं.

<><><><><>

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याबद्दल कथित अपमानास्पद टिप्पणी केल्यामुळे, पश्चिम बंगालमधले भाजपाचे राज्यसभा खासदार नागेंद्रनाथ रॉय उर्फ अनंत महाराज यांना यापूर्वी प्रदान करण्यात आलेला 'बंग विभूषण' हा पश्चिम बंगालचा सर्वोच्च नागरी पुरस्कार आज मागं घेत रद्द करण्यात आला.

<><><><><>

दिल्लीच्या लाल किल्ला परिसरात गेल्या वर्षी झालेले आत्मघातकी बॉम्बस्फोट अल कायदा इन इंडियन सबकाँटीनेंट या संघटनेनं घडवले असल्याचं संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेनं घोषित केलं आहे. दहशतवादी कारवायांवर लक्ष ठेवण्यासाठी नेमलेल्या सुरक्षा परिषद पथकानं हा अहवाल दिला आहे. लहान लहान गटांमार्फत या दहशतवादी संघटनेच्या कारवाया चालत असून त्यांचा धोका दक्षिण आशियात वाढत असल्याचं अहवालात नमूद केलं आहे. यापूर्वी फेब्रुवारीत सादर केलेल्या पहिल्या अहवालात या पथकानं या बॉम्बहल्ल्यात जैश ए मोहम्मद या दहशतवादी संघटनेचा हात असल्याचं म्हटलं होतं. गेल्या वर्षी नोव्हेंबरमधे झालेल्या या आत्मघातकी बॉम्बहल्ल्यात ११ जणांचा बळी गेला.

<><><><><>

ब्रिक्स संघटनेचं अध्यक्षपद चौथ्यांदा भारताकडे आल्याचं चीन आणि रशियाने स्वागत केलं आहे. नवी दिल्लीच्या विवेकानंद आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठानात ब्रिक्स देशांच्या राजदूतांची गोलमेज परिषद आज झाली, त्यात या दोन्ही देशांच्या राजदूतांनी भारताच्या अध्यक्षपदाच्या काळातल्या कार्यक्रमाला पाठिंबा दिला.

//<><><><><>//